


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २४०, रविवार ९ जुन २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# पंकजा मुंडेंच्या आडून आगरकरांची वेगळीच फिल्डींग!

■ मग सुजय विखेंना नगरमध्ये आमंत्रित का करत नाही? ■ पार्सल नाकारणाऱ्या मतदारांवर पुन्हा तोच राजकीय बोजा का आणि कशासाठी ?

बीड लोकसभा मतदारसंघातून पराभूत झालेल्या पंकजा मुंडे यांना भाजपाने नगर शहर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी द्यावी अशी थेट मागणी भाजपाचे नगर शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांनी केल्याने राजकीय वतुळात उलट-सुलट चर्चा झडू लागली आहे. ॲड. अभय आगरकर यांच्या या राजकीय फिल्डींगला वेगवेगळे कंगोरे दिसतात. पण बीडच्या पंकजा मुंढे यांना भाजपाने नगर शहर विधानसभेची उमेदवारी देण्याची मागणी करणाऱ्या आगरकरांनी याच लोकसभा मतदारसंघातून पराभूत झालेले भाजपाचे मा. खा. डॉ. सुजय विखे यांच्यासाठी उमेदवारी देण्याची मागणी का केली नाही ? पंकजा मुंढे ओबीसी प्रवर्गातील आणि विखे हे सर्वसाधारण प्रवर्गातील असल्याने आगरकरांनी मुंढेंची मागणी केली का असे एक ना अनेक अनुषंगीक प्रश्न उपस्थित होऊ शकतात.




वास्तविक आगरकर कोणती मागणी करत असले तरी नगर जिल्हयातील मतदारांना राजकीय पार्सल मान्यच नाही. उत्तरेतील विखेंना दक्षिणेत पराभूत व्हावे लागले. तर उत्तरेतील मतदारांनी दक्षिणेतील लोखंडे यांना पराभूत केले. आगरकर हे बीडच्या पंकजा मुंढे यांचे नाव नगर विधानसभेसाठी सुचवून राजकीय पार्सल नाकारणाऱ्या मतदारांवर पुन्हा तोच राजकीय बोजा का आणि कशासाठी लादू इच्छितात ?

खरे तर पंकजा मुंढे यांचे नाव सुचवून भाजपा जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर नगरमध्ये भाजपाकडे सक्षम उमेदवार नाही. हे अधोरेखित करतात की मुंढे यांच्या आडून आगरकर हे स्वतः:चे घोडे दामटू इच्छितात हे राजकीय कोडेच आहे. भाजपाकडे भैय्या गंधे, बाबासाहेब वाकळे आणि अन्य इच्छुक उमेदवार असताना मुंडेंचे नाव सुचविण्याची उपरती आगरकरांना का व्हावी ? त्यांनी स्वतः:ने भाजपाच्या पाठींब्यावर निवडणूक लढवून भाजपा-सेनेला अपशकून करण्याचा प्रयत्न केलाच होता. हा इतिहास दुर्लक्षून चालणार नाही. मुंडे यांच्या आडून स्वतः:चे नाव पुढे करण्याची ही रणनीती असू शकते.

महाराष्ट्रात भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी अशी महायुती आहे. विधानसभेला ही महायुती राहू शकते. जागा वाटपात नगर शहर विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी अजितदादा यांच्या कोटयात जाईल. संग्राम जगताप त्यांचे विद्यमान आमदार आहेत. मग आगरकर हे जिल्हाध्यक्ष असूनही पंकजा मुंढेंचे नाव सुचवितात याचाच अर्थ त्यांनी महायुती विधानसभा निवडणूकीत तुटणार आणि भाजपा स्वतंत्र निवडणूक लढविणार असाच अन्वयार्थ निघू शकतो. महायुती तुटणार ही खबर आगरकरांना पक्षाच्या कोणत्या वरिष्ठाने दिली हे जाहिर करून मुंढेंच्या उमेदवारीची मागणी करावी. पंकजा मुंढे यांनी पाथर्डी-शेवगांव विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी करावी अशी मागणी वेळोवेळी झालेली आहे. स्व. गोपीनाथ मुंढे यांनी परळी माझी आई तर पाथर्डी माझी मावशी आहे. आईने झिडकारले तर मावशी स्विकारते म्हणून पंकजा मुंढे यांच्यासाठी पाथर्डी-शेवगांवची मागणी होणे समजू शकते. तेथे त्यांना मानणारा मतदार असून त्यांच्या समाजाचे किमान प्राबल्य आहे.



## नगरमधून मुंढे आमदार कशा होणार ?

आगरकरांनी गणित समजून सांगावे ,पण ही अवस्था अहमदनगर शहरात हमखासच नाही. या समाजाचे महानगरपालिकेत फारसे नगरसेवक सुध्दा जातीच्या बळावर निवडून येत नाहीत. मग पंकजा मुंढे नगरमधून आमदार कशा होणार याचे गणित आगरकरांनी जरूर समजून सांगावे. स्व. गोपीनाथ मुंढे यांचे नगर शहरात काम आहे हा युक्तीवाद तर फारच तकलादू ठरतो. नगर शहाराच्या सुधारणांचे शिल्पकार स्व. बार्शीकर पराभूत होऊ शकतात मग पंकजा मुंढेंची काय कथा ? हे भाजपा जिल्हाध्यक्षांनी समजून घेतले पाहिजे.

## आगरकरांनी भ्रमात राहू नये

उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विशाल गणपती मंदिराचे अध्यक्ष आगरकरांचा विशेष उल्लेख करून घेतला म्हणून जनमत आगरकर यांच्या बरोबर आहे या भ्रमात त्यांनी राहू नये. मंदिर ट्रस्टच्या २८८ सभासदांच्या पुढे ते वर्षानुवर्षे जाऊ शकले नाही. वंश परंपरेने तुमच्याकडे मंदिराची सुत्रे असली तरी तेवढया कर्तुत्वावर समाज स्विकारत नाही हे आगरकरांनी एकदा विधानसभेला अनुभवले आहे, मग त्याच तिकीटावर पुन्हा तोच खेळ का आणि कशासाठी ?

## पक्षांतर्गत शह-काट शहाची खेळी ?

पंकजा मुंढे यांच्या नावाची शिफारस करून पक्षांतर्गत इच्छुकांना गारद करण्याची ही राजकीय चाल असू शकते. नगर शहराच्या मतपेटीवर आता मुस्लिम आणि मराठा समाजाचा प्रभाव राहणार आहे.पंकजा मुंढे यांचे बीडमध्ये झाले त्यापेक्षा वेगळे होणार नाही. पंकजा मुंढे सुध्दा ही ऑफर स्विकारण्याची सुताराम सुध्दा शक्यता नसताना आगरकर त्यांच्या नावाची शिफारस करत असतील तर त्यांचा बोलविता धनी कदाचित वेगळा असू शकतो. ही पक्षांतर्गत शह-काट शहाची खेळी तर नाही ना ? अशी कोणी शंका घेतली तर काय उत्तर देणार ?

# नगरात राष्ट्रवादीच्या लोकसभा निवडणूकीचा विजयोत्सव !

■ १० जुन रोजी राष्ट्रवादीच्या देशव्यापी वर्धापनदिनाचे आयोजन ■ शरद पवारांसह देशपातळीवरील कार्यकारणी सदस्यांची उपस्थिती ■ नगरच्या न्यू आर्टस कॉलेजच्या मैदानावर होणार कार्यक्रम ■ तालुकाध्यक्ष बाबाजी तरटे यांची माहिती

पारनेर : प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या २५ व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून अलिकडेच पार पडलेल्या लोकसभा निवडणूकीत पक्षाने मिळविलेल्या घवघवित यशाचा विजयोत्सव साजरा करण्यात येणार असल्याची माहिती पक्षाचे तालुकाध्यक्ष बाबाजी तरटे यांनी दिली.

तरटे म्हणाले, या वर्धापन दिनासाठी नगर येथील न्यू आर्टस कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेजच्या मैदानावर वॉटरप्रुफ मंडप उभारणीचे काम सुरू झाले असून १० जुन रोजी सायंकाळी ५ वाजता या कार्यक्रमास प्रारंभ होणार आहे.

या वर्धापनदिनास पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्यासह पक्षातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमास जिल्हयातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षावर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी, नागरीकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन तरटे यांनी केले. दरम्यान, शनिवारी खा. नीलेश लंके यांच्या पारनेर येथील कार्यालयात पारनेर-नगर मतदारसंघातील कार्यकर्त्यांची बैठक होऊन १० जुनच्या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले.



■ राष्ट्रवादीच्या देशव्यापी वर्धापनदिनाच्या नियोजनाची बैठक खा. नीलेश लंके यांच्या संपर्क कार्यालयात पार पडली.

## नवनिर्वाचित खासदारांचा सत्कार

या वर्धापनदिन कार्यक्रमामध्ये नव्याने विजयी झालेल्या पक्षाच्या सर्व खासदारांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. पक्षाच्या सर्व आमदारांची यावेळी उपस्थिती असेल.


## देशव्यापी वर्धापनदिन

महाविकास आघाडीने नगर जिल्हयातील दोन्ही जागा जिंकत महायुतीच्या जागा हिरावून घेतल्याने राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आहे. त्यातच आता देशव्यापी वर्धापनदिनाचेही नगर जिल्हयात आयोजन करण्यात आल्याने कार्यकर्त्यांचा उत्साह अधिकच दुणावला आहे. या वर्धापनदिनास देशपातळीवरील सर्व कार्यकारणी सदस्य उपस्थित राहणार असल्याचे पारनेर तालुकाध्यक्ष बाबाजी तरटे यांनी सांगितले.

# हे सत्ता डोक्यात गेल्याचे लक्षण ; चित्रा वाघ यांचे टिकास्त्र

नगर : प्रतिनिधी

खा. नीलेश लंके यांचे समर्थक राहुल झावरे यांनी राक्षसी पध्दतीने विजय साजरा करण्यास केलेली सुरूवात ही सत्ता डोक्यात गेल्याचे लक्षण आहे. मोठया ताई त्यांना शिक्षा देणार की पाठीशी घालणार असा सवाल भाजपाच्या महिला प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांनी केला.




पारनेर तालुक्यातील दलित समाजातील महिलेस राहुल झावरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी जातीवाचक शिविगाळ करीत पोटात लाथा मारून लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याचा आरोप भाजपा पदाधिकाऱ्यांनी केला आहे. या पार्श्वभुमीवर नगरमध्ये चित्रा वाघ यांनी आपली भूमिका मांडली.

निवडणूकीतील विजय पचवता आला पाहिजे आणि मिरवताही आला पाहिजे. सत्तेची हवा आणि माज इतका डोक्यात गेला असेल तर शिवरायांच्या पावन भूमीत तो कधीही सहन केला जाणार नाही. जिजाऊंच्या लेकीचं औरंग्याच्या औलादींना धडा शिकवतील असा इशारा वाघ यांनी दिला.










# तंत्रमंत्र
विज्ञानयुगातील बितंबातम्या

# गुगलवर फोटो ठेवा सुरक्षित

**सोशल नेटर्किंग माध्यमातून आपले फोटो, व्हिडीओ शेअर करण्याचा ट्रेण्ड आहे. त्यातही सेल्फी काढण्याची हौसही मोठी असते. मात्र, इतक्या संख्येने काढल्या जाणारे, शेअर केले जाणारे फोटो साठवण्याचा आणि ते लगेचच शेअर करण्यासाठी उपलब्ध होण्याचा प्रश्न असतो. हीच अडचण आता गुगलने दूर केली आहे. मित्रमैत्रिणी आणि नातेवाईकांसोबत फोटो, व्हिडीओ शेअर करणे गुगलने सोपे केले आहे. या सर्व गोष्टी तुम्ही आता गुगल फोटो या सेवेद्वारे तुमच्या जी-मेल अकाऊंटशी लिंक असलेल्या क्लाऊडवर साठवून ठेवू शकता. त्यामुळे कोणत्याही गॅझेटवरून एका छोट्या लिंकद्वारे ते इतरांसोबत शेअर करता येईल.**


गुगल फोटो या सुविधेत १६ मेगापिक्सलपर्यंतचे फोटो आणि १०८० पी अर्थात फुल एचडी क्षमतेचे व्हिडीओ साठवून ठेवता येतील. यापेक्षा अधिक क्षमतेचे व्हिडीओ-फोटो असतील तर त्याचे रिझोल्यूशन कमी करून गुगल सेव्ह करून ठेवेल. हे सर्व क्लाऊडवर सेव्ह होणार असल्याने तुमचा मोबाइल, कम्प्युटरमधील मेमरी वापरली जाणार नाही. याअंतर्गत अमर्याद फोटो, व्हिडीओ साठवून ठेवू शकाल. मात्र तुम्हाला १६ मेगापिक्सल किंवा १०८० पी पेक्षा अधिक दर्जेदार व्हिडीओ-फोटो साठवून ठेवायचा असेल तर मात्र गुगलच्या जुन्या सेवेमधील १५ जीबीची जागा वापरता येईल. मात्र, त्यासाठी तुम्हाला ओरिजिनल किंवा हायक्वालिटी प्लॅन यामधून निवड करावी लागेल.

## स्पर्धक कोण?

ॲपल अशाच प्रकारची सेवा देऊ करत असून ती केवळ ॲपलच्या डिव्हाइसवरच आहे. तसेच फोटो साठवण्याची मर्यादित क्षमताच त्यात उपलब्ध आहे. फ्लिकरमध्ये १ टीबीपर्यंतचे फोटो साठवता येतात.

## वापर कसा कराल

मोबाइल, कम्प्युटर, टॅबवरून https://photos.google.com/ ही लिंक ओपन केल्यावर तुम्हाला या सेवेचा लाभ घेता येईल. किंवा गुगल प्ले स्टोअरमधून Photos नावाचे ॲपही डाऊनलोड करून तुम्ही ही सुविधा वापरू शकता.



## गुगलच करणार वर्गीकरण

तुमच्या फोटोचा प्रकार, त्यातील व्यक्ती-ठिकाणे यांचा विचार करून गुगल फोटो त्यांचे स्वतःहून वर्गीकरण करणार आहे. त्यामुळे तुमच्या घराचे फोटो, मुलांचे फोटो, तुमच्या पाळीव प्राण्यांचे फोटो असे वर्गीकरण तुम्ही करण्याची गरज राहणार नाही. हे फोटो सर्च करणेही सोपे असून फोटोतील तुमच्या लक्षात असलेली गोष्ट सांगून तुम्ही सर्च केले की लगेच तशा प्रकारचे फोटो तुमच्यासमोर हजर होतील. यामध्ये फोटो एडिटिंगचीही सुविधा देण्यात आली असून त्यात फोटोचे बेसिक एडिटिंग करता येते. फोटो नेमका कसा आणि कुठे एडिट करायचे हे जर तुम्हाला माहिती नसेल तर त्यात ऑटो फिक्सचा पर्याय देण्यात आला असून याद्वारे तुमचा फोटो गुगलच एडिट करून अधिक चांगला कसा दिसेल, याचा प्रयत्न करते. यात कोलाज, पॅनोरमा, ॲनिमेटेड फाइल तयार करण्याचाही पर्याय आहे. गुगल फोटोमध्ये सेव्ह केलेले व्हिडीओ-फोटो तुम्ही ट्विटर, व्हॉट्स ॲप, फेसबुक वगैरे कुठल्याही ठिकाणी शेअर करू शकाल. त्यासाठी आवश्यक लिंक तयार करण्याचा पर्याय यात देण्यात आला आहे. त्यामुळे गुगल फोटो नसलेल्या व्यक्तीही याठिकाणी सेव्ह केलेले फोटो पाहू शकतील किंवा डाऊनलोड करू शकतील.

# कुठेही असा; संगणक, लॅपटॉप तिथून हाताळा!


**घरच्या अथवा कार्यालयातील संगणकामधील एखादी फाइल आपल्याला अचानक हवी असते. पण त्यावेळेस आपण संगणकाच्या जवळ नसतो. कामानिमित्त बाहेर असतो. जी फाइल हवी ती नेमकी आपल्या मेलमध्ये नसते. अशा वेळी काय करायचे हे आपल्याला सुचत नाही. मग काय करायचे, असा प्रश्न निर्माण होतो. पण तंत्रज्ञानाने यावरही उत्तर काढलेले आहे. आपल्या घरचा अथवा कार्यालयातील संगणक आपण थेट आपल्या हातातील स्मार्टफोन अथवा टॅबशी जोडून संगणकाचा ताबा मिळवू शकतो. हे करण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत. यातील काही पर्याय पाहू या...**

## क्रोम रीमोट डेस्कटॉप

एखादा पत्ता... बातमी... माहिती... छायाचित्र... आदीचा शोध घ्यायचा झाला तर पटकन गुगलवरच हात जातो. आपल्या घरातील संगणक आपल्या मोबाइलमधून वापरण्याचा पर्यायही गुगलने उपलब्ध करून दिला आहे. सहजता ही गुगलची खासियत असल्यामुळे ही सुविधाही अगदी सोप्या स्वरूपात उपलब्ध करून दिली आहे. विंडोज, मॅक आणि लिनक्स ही ऑपरेटिंग प्रणाली असलेले संगणक अँड्रॉइड आणि आयओएसवर उपलब्ध करून देण्यासाठी गुगल रीमोट डेस्कटॉप ही सुविधा उपयुक्त ठरते. क्रोम रीमोट कसे वापरायचे? जाणून घेऊया. सर्वप्रथम तुमच्या मोबाइल ब्राऊजरमध्ये क्रोम रीमोट डेस्कटॉप एक्स्टेंशन डाउनलोड करून घ्या. हे क्रोमच्या वेब स्टोअरमध्ये उपलब्ध आहे. डाउनलोड झाल्यानंतर अवघ्या काही सेकंदांत ते इंस्टॉल होते. हे करण्यासाठी क्रोमचे लॉगइन असणे आवश्यक आहे. एकदा का तुम्ही हे इंस्टॉल केले की तुमच्या बुकमार्कमध्ये क्रोम रीमोट डेस्कटॉपची लिंक ॲड होते. ज्यावेळेस तुम्ही पहिल्यांदा रीमोट ॲक्सेस घेता त्यावेळेस तुम्हाला एक छोटीशी युटिलिटी डाउनलोड करावी लागते. ही युटिलिटी एका मिनिटापेक्षा कमी अवधीत डाउनलोड होते. यासाठी क्रोम तुम्हाला मदत करते. त्याप्रमाणे करत गेल्यास ती युटिलिटी डाउनलोड आणि इंस्टॉल होते. युटिलिटी इंस्टॉल झाल्यानंतर क्रोम रीमोट डेस्कटॉप तुम्हाला एक पिन देण्यास सांगतो. तुम्हाला पाहिजे तो पिन देऊन तुम्ही तुमचा रीमोट ॲक्सेस सुरक्षित करत असता. एकदा का तुम्ही पिन टाकला की काही वेळातच तुमचा संगणक रीमोट ॲक्सेसच्या यादीत येतो. म्हणजे तुमच्या मोबाइलमध्ये माय लॅपटॉप आणि माय डेस्कटॉप असा पर्याय येतो. हे झाल्यावर तुमच्या संगणकावर तुम्ही क्रोमचे रीमोट डेस्कटॉप एक्स्टेंशन डाउनलोड करून घ्या. त्यानंतर ते तुम्ही सुरू केल्यावर तुम्हाला तुमच्या संगणकाची यादी दिसेल. त्यातील पर्याय निवडला की तो मोबाइलशी जोडला जाईल. ही जोडणी करत असताना तुम्हाला पिन विचारला जाईल. मोबाइल ॲपमध्ये दिलेला पिन इथे दिला की तुमची जोडणी पूर्ण होते. पिन दिल्यावर तुम्हाला हा पिन सेव्ह करायचा आहे का? असे विचारले जाते. मात्र तसे करू नका. जोडणी पूर्ण झाले की तुमच्या फोनमध्ये डेस्कटाप दिसू लागतो.

## वापरा टीम व्ह्यूअर

सर्वांकडेच क्रोम ब्राऊजर असतेच असे नाही. अनेक कार्यालयांत फायरफॉक्स वापरले जाते. यामुळे तुम्ही क्रोम रीमोट डेस्कटॉप वापरू शकत नाहीत. यामुळे तुम्ही टीम व्ह्यूवर या ॲपचा वापर करू शकता. क्रोम रीमोट डेस्कटॉपप्रमाणे तुम्ही विंडोज, मॅक, अँड्रॉइड, आयओएस, लिनक्स यासाठी हे ॲप वापरू शकतो.



याचबरोबर इतरही ऑपरेटिंग प्रणालीसाठी याचा वापर होतो. मात्र हे वापरणे क्रोम रीमोट डेस्कटॉपपेक्षा थोडे अवघड आहे. सर्वप्रथम तुम्ही संगणकावर टीम व्ह्यूअर संकेतस्थळाला भेट द्या व तेथून टीम व्ह्यूअरची अद्ययावत आवृत्ती डाउनलोड करून घ्या. हे इंस्टॉल होत असताना तुम्ही याचा वापर कशासाठी करणार हे सांगावे लागते. म्हणजे वैयक्तिक उपयोगासाठी असेल तर हे सॉफ्टवेअर मोफत वापरता येते. नाहीतर काही पैसे भरावे लागतात. तुम्ही पर्याय निवडला की काही मिनिटांत इंस्टॉलेशन प्रक्रिया पूर्ण होते. पहिली पायरी पूर्ण झाली की तुम्हाला एक आयडी आणि पिन दिला जाईल. म्हणजे ज्यावेळेस तुम्हाला रिमोट ॲक्सेस हवा आहे त्यावेळेस तुम्हाला आयडी आणि पिन द्यावा लागतो. तेव्हाच तुम्हाला मोबाइलवर ॲक्सेस मिळू शकतो. सुरक्षेच्या दृष्टीने हे योग्य असले तरी ज्यावेळेस आपल्याला ॲक्सेस हवा असेल तेव्हा एखाद्या व्यक्तीला आपल्या संगणकावर लॉगइन करणे आवश्यक असते. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यावर तुमचा संगणक टीम व्ह्यूअरच्या सर्व्हरवर पोहोचतो. यानंतर संगणकाचा वापर मोबाइलवर करण्यासाठी तुम्हाला मोबाइलमध्ये टीमव्ह्यूअरचे ॲप डाउनलोड करावे लागेल. यानंतर तेथे असलेला कॉम्प्युटर्स हा पर्याय निवडा. यानंतर तुमच्या लॉगइन आयडीने लॉगइन करा. लॉगइन झाल्यानंतर माय कॉम्प्युटर्स हा पर्याय तुमच्यासमोर येईल. यानंतर तुम्ही तुमच्या संगणकाचा ॲक्सेस मिळवू शकतो. हे लॉगइन करून संगणक सुरू झाल्यावर तुम्ही संगणक वापरत असताना ज्या काही शॉर्टकीजचा वापर करता त्याचा वापर यात करू शकता. ही या सॉफ्टवेअरची जमेची बाजू म्हणता येईल.

# आधारशी लिंक केलेला मोबाईल नंबर चुकीचा?

**आधार कार्ड हे एक महत्त्वाचे दस्तऐवज आहे, जे सर्वत्र वापरले जाते. तुम्ही नवीन नोकरी किंवा शाळा किंवा महाविद्यालयात प्रवेश घ्या किंवा रेल्वे, विमान तिकीट यांसह कोणतेही सरकारी किंवा खासगी काम करायचे असेल तर आधार कार्ड आवश्यक झाले आहे. मात्र, जर तुमचे सिम कार्ड तुमच्या आधारशी चुकीच्या पद्धतीने लिंक झाले असेल तर तुम्हाला तुरुंगात जावे लागू शकते. अशा परिस्थितीत आजच तुमच्या आधार कार्डवर चुकीचा सिम कार्ड क्रमांक नोंदवला आहे का ते तपासा. जर तुमच्या आधारशी बनावट सिम कार्ड लिंक असेल किंवा तुम्ही तुमच्या आधारकार्डसोबत जोडलेले सीम इतर कोणाला दिले असेल तर ते ताबडतोब परत घ्या. अन्यथा तुम्हाला नुकसान सहन करावे लागू शकते... त्या कार्डवरून काही गुन्हेगारी कृत्य घडल्यास त्याचे धागेदोरे तुमच्यापर्यंत येऊ शकतात... त्या परिस्थितीत तुम्हाला स्वतःची सोडवणूक कठीण जाणार आहे...**

## कोणते सिम कार्ड तुमच्या आधारशी जोडलेले आहे? कसे ओळखायचे...

तुमच्या आधार कार्डशी कोणते सिम कार्ड लिंक आहे? हे जाणून घेणे खूप सोपे आहे, जे घरबसल्या ऑनलाइन कळू शकते. सर्वप्रथम तुम्हाला आधारच्या अधिकृत वेबसाइटवर जावे लागेल, म्हणजे UIDAI. त्यानंतर तुम्हाला वरच्या डाव्या कोपऱ्यात My Aadhaar हा पर्याय दिसेल, ज्यावर तुम्हाला क्लिक करावे लागेल. तुम्ही मोबाइलवर आधारची वेबसाइट उघडल्यास, तुम्हाला वरच्या डाव्या कोपऱ्यात तीन ओळी दिसतील, त्यावर क्लिक केल्यावर My Aadhaar पर्याय दिसेल, ज्यावर क्लिक करावे लागेल. त्यानंतर तुम्हाला तळाशी स्क्रोल करावे लागेल, जिथे तुम्हाला आधार सेवा पर्यायावर क्लिक करावे लागेल. यानंतर तुम्हाला Verify ईमेल/मोबाइल नंबरवर टॅप करावे लागेल. त्यानंतर तुम्हाला एक नवीन पेज उघडेल, जिथे तुम्हाला दोन पर्याय दिसतील. यामधून तुम्हाला मोबाईल नंबर चेक करण्याच्या पर्यायावर टॅप करावे लागेल. यानंतर तुम्हाला आधार कार्डचे 12 अंक टाकावे लागतील. त्यानंतर तुम्हाला तुमचा मोबाईल नंबर टाकावा लागेल. यानंतर तुम्हाला कॅप्चा कोड टाकावा लागेल. जर तुमचा मोबाईल नंबर तुमच्या आधारशी लिंक असेल तर तुम्हाला रेकॉर्ड जुळत असल्याची सूचना मिळेल. त्याचप्रमाणे, जर तुमच्या आधारशी इतर कोणताही मोबाइल नंबर लिंक असेल, तर तुम्हाला रेकॉर्ड जुळत नसल्याची सूचना मिळेल.



# विद्यार्थी होतील स्मार्ट..!

**सुरुवातीला कौतुकापोटी चिमुकल्यांना स्मार्टफोन हाताळायला देत असू तरी, नंतरच्या काळात मात्र त्याचा वाढता वापर पाहून आपणच हा स्मार्टफोन त्याच्या हातून काढून घेतो. हाच स्मार्टफोन त्याच्या शैक्षणिक उपयोगीही पडू लागला आणि तसे ॲप्स त्याला समजावून सांगितले, की त्याचाही स्मार्टफोनचा वापर कामाचाच होऊन जाईल...**

## इंटरॅक्टिव्ह विज्ञान संग्रह

जीवशास्त्रशी संबंधित १०० हून अधिक संज्ञा आणि संकल्पना या ॲपमध्ये आपल्याला देण्यात आल्या आहेत. यातील काही संकल्पनांचे छानसे व्हिडीओजही देण्यात आले आहेत. यातील बरीचशी माहिती आपल्याला फ्लॅशच्या मदतीने सांगण्यात आली आहे. यात मानवी शरीर, वातावरण, पेशी असे विविध विभाग करण्यात आले आहेत. हे ॲप माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरू शकणार आहे. यामध्ये प्रश्नावलीही आहे. हे ॲप वापरण्यासाठी आपल्याकडे थ्रीजी किंवा वाय-फायची जोडणी आवश्यक आहे. यातील शब्द शोधण्यासाठी सर्चचा पर्यायही यात देण्यात आला आहे.

## कायम्बू

हे ॲप शिक्षकांना उपयुक्त असून विद्यर्थ्यांच्या विकासासाठी यामध्ये अनेक गोष्टी देण्यात आल्या आहेत. याचबरोबर विद्यार्थ्यांशी नाते कशाप्रकारे अधिक चांगले करता येईल याही बाबतीत काही टीप्स या ॲपमध्ये देण्यात आल्या आहे. यामध्ये कॅमेराचा वापर करून तयार केलेल्या फाइल्स शेअर करणे, हाताने लिहिलेल्या नोटसचे छायाचित्र काढून ते ई-मेलद्वारे पाठविणे या ॲपच्या माध्यमातून अगदी सोपे होते. या ॲपमध्ये दिलेल्या विविध निकषांच्या आधारे पालकांशी संवाद साधून विद्यार्थ्यांचा अभ्यास करून शिक्षक एखाद्या विद्यार्थ्यांचा परिपूर्ण अभ्यास करू शकतात. ज्याचा वापर त्यातील उणिवा भरून काढण्यासाठी होऊ शकतो.

## लुमिबुक


लुमिबुक हे पुस्तके वाचण्यासाठी उत्तम पर्याय ठरू शकते. या ॲपमध्ये आपल्याला आपल्या आवडीच्या लेखकांच्या पुस्तकांचे अपडेटस सातत्याने येत असतात. इतकेच नव्हे तर यात विविध विषयांना वाहिलेले गटही तयार करण्यात आले आहेत. यातील आपल्या आवडीच्या गटात सहभागी होऊन आपण चर्चेतही सहभागी होऊ शकतो. हे ॲप ऑनलाइन क्लाऊडवर आधारित असल्यामुळे आपल्या फोनची मेमरीही कमी खर्च होते. याचबरोबर आपल्याला यात माहिती सातत्याने मिळत राहते.

## ओली सेफ ब्राऊझर

आपल्या मुलांनी वाईट विचारांची संकेतस्थळे पाहू नयेत यासाठी आपण इंटरनेटवर संकेतस्थळे ब्लॉक करून ठेवतो, मात्र मोबाइलवर हे आपल्याला करणे शक्य नसते. यामुळे यासाठी ओली सेफ ब्राऊझर तयार करण्यात आले आहे. या ब्राऊझरच्या माध्यमातून आपल्याला सुरक्षित ब्राऊझिंग करता येते. यात ७०० हून अधिक संकेतस्थळे बंद करण्यात आली आहेत. यातील ब्लॉक लिस्ट आपण आपल्या सोयीने बदलूही शकतो. इतकेच नव्हे तर इंटरनेटचा वापर किती केला याचा हिशेबही या माध्यमातून आपल्याला ठेवता येऊ शकतो. ज्यांना आपल्या ब्राऊझिंगची हिस्ट्री कुणासाठी खुली करावयाची नसेल त्यांनी हिस्ट्रीला पासवर्डही देता येणार आहे.



# लॉकही हवे स्मार्ट



**आपल्या मोबाइलचा गैरवापर कोणी करू नये म्हणून अनेक जण आपल्या स्मार्टफोनला विशिष्ट स्क्रिन लॉक लावतात. या लॉकमध्ये तुम्ही आणखी काही वेगवेगळ्या पर्यायाचा विचार करू शकता.**

सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत आपल्या हातात सतत फोन आणि फोन असतो. काही लोकांना फोनचं व्यसन इतकं असतं की एक मिनिट जरी फोन नजरेआडून गेला तरी जीव कासावीस व्हायला सुरुवात होते. त्यामुळे फोन आपल्या नजरे समोर राहावा, याची जबाबदारी अनेक जण घेतात. त्यातून काही जणांना दुसऱ्याच्या फोनला हात लावून आतमध्ये असणारे मेसेज, फोटो पाहण्याची वाईट सवय असते. असल्यांच्या हाती आपला मोबाइल फोन पडू नये किंवा कोणीही आतमधल्या फोटो किंवा डाटाचा गैरवापर करू नये म्हणून आपण किती खबरदारी घेतो. फोन सुरक्षित राहावा यासाठी मोबाइलमध्ये काही खास सेटिंग असतात. त्यातील एक सेटिंग म्हणजे फोन लॉक करणं किंवा त्याला पासवर्ड



ठेवणं. पण बऱ्याचदा आपण आपलं नाव किंवा आपल्या वाढदिवसाची तारीख असाच काही पासवर्ड ठेवतो. त्यामुळे हा पासवर्ड उघडून आतील माहितीचा गैरवापर करणारे अनेक जण आहेत. तुमचा स्मार्टफोन लॉक करण्यासाठी आणि आतील माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी वेगवेगळे ॲप्स आले आहेत. या ॲप्समध्ये असणारे लॉकर तुमच्या माहितीचा आणि फोटोंचा खजिना सुरक्षित ठेवण्यास मदत करतात. त्यात पॅटर्न लॉक, तुमचा आवाज किंवा बोटांचे ठसे वापरून तुम्ही तुमचा फोन लॉक करू शकतात.

## थीक लॉक...


तुम्हाला तुमच्या फोनसाठी काही वेगळे स्क्रिन लॉक हवे असतील, तर तुम्ही थिम लॉकच्या पर्यायाकडे पाहायला पाहिजे. या थिम लॉकमध्ये सध्या गो लॉकर हे ॲप चांगलंच चाललं आहे. त्याचबरोबर सी लॉकर, थेफ्ट लॉकर, डाय लॉकर असे वेगवेगळे लॉकिंग ॲप्स तुम्ही फोनसाठी वापरू शकता. या ॲप्सनं वेगवेगळ्या प्रकारचे स्क्रिन लॉक तयार केले आहेत. म्हणजे जर तुमचा पॅटर्न लॉक एखादा जबरदस्तीनं उघडू पाहत असेल तर एका ठराविक प्रयत्नानंतर तुमचा फोन बंद होतो. कारण तुमचं पॅटर्न लॉक चुकीचं असतो. मोबाइलच्या सुरक्षेसाठी मोबाइलच बंद होतो, मग हे पॅटर्न लॉक उघडण्यासाठी बऱ्याचदा गॅलरीमध्ये आपली धाव असते. पण काही ॲप्स असे आहेत, ज्यामुळे माहिती नसताना कोणी जबरदस्तीनं तुमचं लॉक उघडू पाहत असेल तर अलार्म वाजायला सुरुवात होते. त्यामुळे गैरवापर करणाऱ्याच्या हातातून तुम्ही तुमचा फोन वाचवू शकता.

## गेमिंग लॉक

तुम्हाला गेमिंग लॉक देखील मिळतील. काही सेकंदाचा गेम खेळायचा आणि खेळ पूर्ण केल्यावर तुमचा मोबाइल ऑन होईल. अशा प्रकारे लॉक ठेवण्याचा एक तोटा असा आहे की तुमचा फोन अनलॉक व्हायला बराच वेळ लागतो. पण मोबाइलचा गैरवापर टाळायचा असेल तर हे अशा पझल्स किंवा गेमिंग लॉकचा पर्याय कधीही उत्तम. असे लॉक उघडण्यासाठी बऱ्याचदा डोकं चालवावं लागतं, त्यामुळे अनेकदा असे विचार करायला लावणाऱ्या वेळखाऊ लॉक उघडण्याच्या फंद्यात कोणी पडत नाही. त्याचप्रमाणे तुमची क्रिएटिव्हिटी उत्तम असेल तर काही ॲप्स स्वत:चे लॉक स्वत: तयार करण्याची सुविधा देखील ग्राहकाला देतात. त्यामुळे तुम्ही तुमचे फोटो, तुमचा पॅटर्न किंवा आवडेल असे विशिष्ट आकार वापरून तुमचे लॉक्स तुम्हीच तयार करू शकता.

## वॉलपेपर लॉक

तुम्हाला अधिक स्मार्ट स्क्रिन लॉकर हवं असेल तर तसेही ॲप्स आहेत. ज्यात प्रथमदर्शी तुमचा फोन अनलॉक केल्यावर एक वॉलपेपर दिसेल. हे वॉलपेपर म्हणजेच लॉक. या वॉलपेपरमधील नेमक्या एखाद्या जागी हे लॉक असेल ते विशिष्ट पद्धतीनं हाताळलं की तुमचा फोन सुरू होईल. म्हणजे बघा, समजा एका झाडाला फळ लागलेला वॉलपेपर असेल तर त्यापैकी एखादं फळ विशिष्ट प्रकारे खाली खेचायचं म्हणजे तुमची स्क्रिन अनलॉक होईल. असेच कार्टूनचे देखील थिम लॉक आले आहेत. कार्टूनची विशिष्ट प्रकारे हालचाल करायची वगैरे वगैरे. नेहमीच्या पॅटर्न लॉकपेक्षा वेगळे पॅटर्न हवे असल्यास या लॉकचा पर्याय चांगला आहे.



## शॉर्ट न्यूज

### राहत्या घरातून ७१ हजारांचा ऐवज लांबविला

**संगमनेर :** तालुक्यातील देवकौठे येथे रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्याने अर्धवट ढकललेल्या घराच्या दरवाजातून आत प्रवेश करीत सोन्या चांदीच्या दागिन्यासह ७१ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. रात्रीच्या सुमारास ही घटना घडली. याप्रकरणी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. बाबासाहेब पाराजी कहांडळ यांच्या घरातील व्यक्ती झोपलेल्या असताना अज्ञात चोरट्याने घराच्या दरवाजातून आज प्रवेश केला व कपाटाचे दरवाजे उघडले. सोन्याचे दागिने व स्टीलचे डब्यातून तसेच बॅगमधून रक्कम लंपास केली.

### हुक्का पार्लरवर पोलिसांचा छापा

**नगर :** सर्जेपुरा भागातील एका तळ घरात सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी कारवाई केली आहे. हुक्का पार्लर चालविणाऱ्यासह हुक्का ओढणाऱ्या दोघांविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अंमलदार गुंजाळ यांनी फिर्याद दिली आहे. हुक्का पार्लर चालक कृष्णा अशोक इंगळे, हुक्का ओढणारे प्रशांत गजानन सोनवणे, परेश सुर्यकांत डहाळे अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. नगर शहरात हुक्का पार्लरची संस्कृती रूजली असून तरूणांची पावले याकडे वळू लागली आहेत.

### पावसाच्या धास्तीमुळे उन्हाळी बाजरी काढणीला वेग

**श्रीगोंदा :** तालुक्यातील नगर-मांडवगण रोडवरील शेतकरी सतीश निवृत्ती खेतमाळी यांनी आपल्या एक ते दीड एकरामध्ये बाजरीचे पीक घेतले होते. पावसाला सुरुवात झाली असून मजूर मिळत नसल्याने त्यांनी हार्वेस्टर च्या साह्याने बाजरी काढण्यास पसंती दिली आहे. रब्बी हंगामातील ज्वारी, हरभरा, गहू आधी पिकांची काढणी होऊन दोन महिन्यांच्या कालावधी उलटला तोच उन्हाळी मशागती सोबत उन्हाळी बाजरी, भुईमूग काढण्याच्या कामास प्रारंभ झाला.

### आमटी भाकरी भंडारा कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नेवासा :** येथे दर महिन्याच्य आयोजित मासिक आमटी भाकरी भंडारा कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला या निमित्ताने भगवान विश्वकर्मा मंदिरात युवा उद्योजक संतोष मोहीम व रेखा मोहीम यांच्या हस्ते भगवान विश्वकर्मा यांच्या मूर्तीचे पूजन करून सपत्नीक आरती करण्यात आली. यावेळी झालेल्या भंडारा कार्यक्रम प्रसंगी आमटी भाकरी प्रसादाचे अन्नदातेचे मंदिराचे प्रमुख इंजिनियर सुनीलराव वाघ, वास्तूशिल्पकार राजेंद्र परदेशी, यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राहात्यात महाविकास आघाडीकडून विजयाचा जल्लोष

**राहाता :** राज्यात तसेच देशात महाविकास आघाडीने लोकसभा निवडणुकीत चांगले यश संपादन केल्याबद्दल व शिर्डी लोकसभा मतदारसंघात महविकास आघाडीने आपले वर्चस्व सिद्ध करून दाखवल्याबद्दल राहाता शहरात महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करत विजयाच्या घोषणा दिल्या.

# हिवरेबाजारचा विकास देशातील खेड्यांसाठी प्रेरणादायी

## बिष्ट विशेष आयुक्त अजयकुमार यांचे प्रतिपादन




**हिवरे बाजार : प्रतिनिधी**

**हिवरे बाजारचे नाव बरेच दिवस ऐकून होतो आज मला हिवरे बाजारचा शाश्वत विकास पाहण्याचे भाग्य मिळाले.पावसाचे वार्षिक प्रमाण खूप कमी असताना गाव ऐन मे महिन्यात गाव जलसमृद्ध असल्याचे पाहून मला नवल वाटले असे प्रतिपादन बिष्ट विशेष आयुक्त अजयकुमार यांनी व्यक्त केले.हिवरे बाजार भेटीनंतर ते बोलत होते.**

आयुक्त अजयकुमार पुढे म्हणाले की, पद्मश्री पोपटराव पवारांनी लोकसहभागातून जलसंधारणाचे जे चोख काम केले त्याचा हा चांगला परिणाम आहे.पोपटराव पवार हे स्वत: अशी एक संस्था आहे की ज्यांनी श्रमशक्ती जागृत करून गावाला आर्थिक समृद्धी मिळवून दिली.हिवरे बाजारमधील प्रत्येक परिवाराचे उत्पन्न हे इतर गावातील परिवाराच्या तुलनेत जास्त आहे.त्याचा मला अभिमान वाटतो.हिवरे बाजारचा लोकसहभागातून झालेला विकास संपूर्ण देशातील खेड्यांसाठी प्रेरणादायी आहे.

गावचे भाग्यविधाते पद्मश्री पोपटराव पवार व गावकऱ्यांना धन्यवाद असा अभिप्राय भारत सरकारचे विशेष आयुक्त व अहमदनगर जिल्ह्याचे निवडणूक निरीक्षक यांनी हिवरे बाजारला भेट दिली असता व्यक्त केले.

# नेवाशा मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात पाण्यासाठी आंदोलन

## महिलांचा चटणी-भाकरी खाऊन ७ तास ठिय्या आश्वासनानंतर महिलांचे आंदोलन मागे



**नेवासा : प्रतिनिधी**

**नेवाशाचा पाणीपुरवठा सुरळीत करावा, या मागणीसाठी शुक्रवारी महिलांनी नगर पंचायतीचे मुख्याधिकारी यांच्या दालनात तब्बल ७ तास ठिय्या आंदोलन दिले. पाणी पुरवठा सुरळीत करा, अन्यथा आंदोलन सुरूच राहील, असा पवित्रा महिलांना घेतला होता. नगरपंचायतीच्या मुख्य अधिकाऱ्यांच्या दालनात आंदोलकांचे जेवण झाल्यानंतर मुख्याधिकाऱ्यांनी तीन दिवसांत पाणीपुरवठा न झाल्यास टँकरने पाणीपुरवठा करू असे, आश्वासन दिल्यानंतर महिलांचे पाणीपुरवठा विषयीचे आंदोलन स्थगित करण्यात आले.**

नेवासे नगरपंचायतीच्या ढिसाळ कारभारामुळे नेवासे शहराचा पाणी प्रश्न अतिशय गंभीर बनला आहे. शहराच्या बाजूलाच मध्यमेश्वर बंधारा तुडुंब भरलेला असताना नेवासे शहरात आठ दिवस पाणी येत नाही, तर उपनगरात तीन तीन आठवडे पाणी मिळत नाही. ही परिस्थिती अतिशय विदारक आहे. या गलथान कारभाराचा निषेध करण्यासाठी शहरातील त्रस्त महिला एकत्र येत नगरपंचायत चौकात त्यांनी धरणे आंदोलन केले. तास दीडतास होऊनही नगरपंचायत प्रशासनाकडून आंदोलकांच्या प्रश्नांची दखल घेतली गेली नाही. म्हणून आंदोलकांनी आपला मोर्चा मुख्याधिकारी यांच्या दालनाकडे वळवला.

मुख्याधिकाऱ्यांच्या दालनामध्ये ठिय्या देत महिलांनी आपले पाण्याविषयीचे प्रश्न पोटतिडकीने मांडले. आपला पाणी प्रश्न पोटतिडकिने मांडताना महिलांनी मुख्याधिकाऱ्यांच्या दालनातच चटणी-भाकरी खाऊन आंदोलन सुरूच ठेवले. उपस्थित अधिकाऱ्यांकडे महिलांना देण्यासाठी कोणतेही ठोस आश्वासन नव्हते. नगरपंचायत प्रशासन पाणीप्रश्न गांभीर्याने घेत नाही, हे यावरून स्पष्ट झाले. अखेर सात तासानंतर प्रभारी मुख्य अधिकारी ज्ञानेश्वर ठोंबरे हे आंदोलकासमोर आले. त्यांनी पाणीपुरवठा सुरळीत करू अथवा ज्या प्रभागात तीन दिवस पाणी येणार नाही, त्या ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा करू, असे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. सदर आंदोलनात मनोज पारखे, संदीप आलवणे, भाऊसाहेब वाघ, करणसिंह घुले यांनी मनोगत व्यक्त केले. या आंदोलनात मोठ्या संख्येने शहरातील महिला सहभागी झाल्या होत्या.

**नगरपंचायत प्रशासनाची उडाली तारांबळ**

जिल्हाधिकाऱ्यांबरोब मिटींग असल्याची सबब देऊन मुख्याधिकारी राहुरी येथेच थांबले. त्यांनी आंदोलकांची दखल घेतली नाही. जेव्हा महिलांनी ठिय्या आंदोलनाचा निर्धार करीत घरी जाण्यास ठाम नकार दिला. त्यामुळे नगरपंचायत प्रशासनाची मोठी तारांबळ उडाली. विशेष म्हणजे नगरपंचायतीचे प्रशासक असलेले तहसीलदार संजय बिरादार यांनी देखील या आंदोलनाला भेट दिली नाही.

# ...तर विधानसभेला आम्ही नाव घेवून पाडणार !

## ■ मनोज जरांगेंचा पाटलांचा इशारा
## ■ अंतरवाली सराटीत पुन्हा उपोषण सुरू



**जालना : प्रतिनिधी**

**मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील आज ८ जूनपासून पुन्हा एकदा अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणासाठी उपोषणाला बसले आहेत. लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे ४ जून रोजीच्या उपोषणाच्या तारखेत बदल करत ८ जून रोजी केली होती. त्यानुसार आजपासून मनोज जरांगे यांनी उपोषण सुरू केले असून राज्य सरकारने सगेसोयरे अध्यादेशाची अंमलबजावणी करावी, अशी आमची मागणी असल्याचे मनोज जरांगे पाटील म्हणाले. यावेळी त्यांनी सरकारला इशाराही दिला. ''जर आमच्या मागण्या पूर्ण केल्या नाही, तर येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत संपूर्ण महाराष्ट्रात सर्व जातीधर्मांचे २८८ उमेदवार उभे केल्याशिवाय आम्ही राहणार नाही, तसेच विधानसभेला आम्ही नाव घेऊन पाडणार'', असा थेट इशारा मनोज जरांगे यांनी दिला. ते अंतवाली सराटी येथे माध्यमांशी बोलत होते.**

**मनोज जरांगे काय म्हणाले?**

''संपूर्ण मराठा समाजाला माझे आवाहन आहे की, आपण शांततेत राहायचं. आमच्या आंदोलनाविरोधात काही निवेदनं जाणीवपूर्वक देण्यात आले आहेत. मात्र, भविष्यात आम्हीही असे निवेदन देऊ. तुमच्या काही रॅली निघतील. मग त्यावेळी आम्हीही अशा प्रकारचे निवेदन द्यायचे का? महाराष्ट्रात रॅली तुम्ही काढणार असाल तर आम्हालाही रहदारीला त्रास होणार आहे. मग तुम्ही तुमची रॅली रद्द करणार आहात का?'', असा सवाल मनोज जरांगे यांनी केला.

पुन्हा उपोषण करण्याची वेळ का आली? या प्रश्नावर बोलताना मनोज जरांगे म्हणाले, ''मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमची मागणी असलेल्या सगेसोयरे या अध्यादेशाची अंमलबजावणी तातडीने करावी एवढीच आमची मागणी आहे. या मागणीसाठीच मी आजपासून पुन्हा एकदा उपोषणाला बसत आहे. तर सरकारला हा कायदा करण्यासाठी काही पुराव्याची गरज लागत असेर तर तब्बल ५७ लाख कुणबी नोंदी सापडल्या आहेत'', असे मनोज जरांगे म्हणाले.

''गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले होते की, राज्यातील मराठा आंदोलनादरम्यान जे गुन्हे दाखल करण्यात आले ते गुन्हे मागे घेऊ. मात्र, एकही गुन्हा मागे घेण्यात आलेला नाही. यामध्ये अनेक विषय आहेत. आमच्या मागण्या सरकारने मान्य कराव्यात अशीच आमची मागणी आहे. सरकाच्यावतीने निवेदनं देण्यात आली. मात्र, मी आचारसंहितेचा सन्मान केला. ४ जून रोजीचे उपोषण ८ जून रोजी केले. आमच्या आंदोलनाच्या विरोधात निवेदन देणारे कोण आहेत? हे सर्वांना माहिती आहेत. मोदींच्या शपथविधीमुळे जनतेला त्रास होणार असेल तर मग शपथविधीचा कार्यक्रम होणार नाही का?'', असा सवालही मनोज जरांगे यांनी केला.

''आम्ही आंदोलन स्थगित केले होते. त्यामुळे पुन्हा परवानगीची आवश्यकता नाही. यावेळी कडक उपोषण करण्यात येणार आहे. आम्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांना आवाहन करत आहोत की त्यांनी पुढे येऊन हा विषय मार्गी लावावा. मात्र, ते लक्ष देत नाहीत. आमचे ध्येय मराठा आरक्षण मिळवणे हेच आहे. जर आरक्षण दिले नाही तर महाराष्ट्रात सर्व जातीधर्मांचे २८८ उमेदवार आम्ही उभे केल्याशिवाय राहणार नाही. मग ती तुमची जबाबदारी असेल. भारतीय जनता पक्षातील जेवढे आमदार आहेत, त्यांनी त्यांच्या पक्षाच्या नेत्यांना सांगावे अन्यथा विधानसभेला नावं घेऊन पाडणार'', असा थेट इशारा मनोज जरांगे यांनी दिला.










# मताधिक्क्याने कार्यकर्त्यांना पं. स. सदस्यपदाचे डोहाळे !

## ▪ खा. नीलेश लंके यांना निघोज गटात विक्रमी मताधिक्य
## ▪ अळकुटी व निघोज गणात इच्छुकांची संख्या वाढली

निघोज : प्रतिनिधी

**नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणूकीमध्ये निघोज-अळकुटी गटामध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार खा. नीलेश लंके यांना विक्रमी मताधिक्क्य मिळाल्याने विशेषतः अळकुटी व निघोज पंचायत समिती गणांमध्ये पंचायत समिती सदस्यपदासाठी अनेक कार्यकर्त्यांना डोहाळे लागले आहेत. महाविकास आघाडीने या निवडणूकीत ताकदीने काम केल्याने जिल्हा परिषदेची उमेदवारी शिवसेनेच्या वाटयाला जाउन डॉ. भास्कर शिरोळे यांना ती निश्‍चित मानली जात आहे.**

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्‍वभुमीवर मा. आ. विजय औटी यांनी भाजपा उमेदवार खा. डॉ. सुजय विखे यांना पाठींबा देण्याचा निर्णय घेतल्यानंतर शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पदाधिकार्‍यांमध्ये चलबिचल होउन त्यांनी दुसर्‍याच दिवशी जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे यांच्या उपस्थितीत नगर येथे पत्रकार परिषद घेत आम्ही उध्दव ठाकरे यांच्या आदेशाचे पालन करणार असल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर या पदाधिकार्‍यांनी उमेदवार नीलेश लंके यांच्याशीही सविस्तर चर्चा झाली. आणि शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते प्रचारात सक्रीय झाले. निघोज-अळकुटी गटामध्ये शिवसेनेचे डॉ. भास्कर शिरोळे यांचा चांगला संपर्क असून त्यांनी व त्यांच्या सहकार्‍यांनी लंके यांच्या प्रचारात योगदान देत लंके यांना विक्रमी आघाडी मिळवून देण्यास हातभार लावला. शिवाय महाविकास आघाडी एकत्र  असेल तर डॉ. शिरोळे यांच्याकडे सहज निवडणूक येण्याची क्षमता आहे. त्याचीच परिणीती डॉ. शिरोळे यांना उमेदवारी देण्यात होईल यात शंका नाही.



### अळकुटीत पुंडे, म्हस्के, कापसे, काटे

पंचायत समितीच्या अळकुटी गणामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे सक्रीय कार्यकर्ते तथा लंके यांचे समर्थक, सेवा संस्थेचे मा. चेअरमन बाळासाहेब पुंडे, संदेश कापसे, चोंभूतचे सरपंच दत्तात्रेय म्हस्के, संतोष काटे यांच्या नावांची चर्चा आहे. उमेदवारीसाठी पुंडे आणि म्हस्के यांच्यात चुरस असल्याचे बोलले जात आहे. अळकुटीची लोकसंख्या पाहता पुंडे हेच उमेदवारीचे दावेदार राहतील असा राजकीय जाणकारांचा होरा आहे.

### उमेदवारीसाठी कार्यकर्त्यांचा कस लागणार

जिल्हा परिषद, पंचायत समितीचा कार्यकाळ संपूण मोठा कालावधी उलटला असला तरी अद्यापही या निवडणूका घेण्यात आलेल्या नाहीत. कार्यकाळ संपण्यास काही अवधी असतानाच अनेकांनी दोन्ही निवडणूकांसाठी तयारी सुरू केली होती. या भागावर राष्ट्रवादीचे प्राबल्य असल्याने राष्ट्रवादीकडून इच्छुकांची संख्या मोठी होती. लोकसभा निवडणूकीच्या पार्श्‍वभुमीवर राजकीय समीकरणे बदलून महाविकास आघाडीने या निवडणूकीत एकत्रीत काम केले. त्यामुळे जिल्हा परिषदेची उमेदवारी शिवसेनेचे डॉ. भास्कर शिरोळे यांना निश्‍चित असून दोन्ही गणांमध्ये उमेदवारी मिळविताना कार्यकर्त्यांचा कस लागणार आहे. अर्थात उमेदवारी देताना निवडूण येण्याची क्षमता असलेल्या कार्यकर्त्यालाच उमेदवारी देण्याचे धोरण खा. लंके यांचे असणार आहे.

### निघोजमध्ये मोठी स्पर्धा

निघोज पंचायत समिती गणात बाबासाहेब कवाद निघोज ग्रामीण पतसंस्थेचे चेअरमन वसंत कवाद, मा. सरपंच ठकाराम लंके, किशन कन्हैय्या दुध उद्योग समुहाचे शिवाजी लंके, दुष्काळ निवारण समितीचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब तथा ज्ञानेश्‍वर लंके, युवा नेते रूपेश ढवण यांच्या नावाची चर्चा आहे. वसंत कवाद हे राष्ट्रवादीचे निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. ठकाराम लंके, बाळासाहेब लंके, शिवाजी लंके हे खा. नीलेश लंके यांच्या विश्‍वासू सहकार्‍यांपैकी एक आहेत. ठकाराम लंके यांनी सरपंच म्हणूनही चांगले काम केले आहे. युवा नेते रूपेश ढवण यांनी शेतकर्‍यांच्या प्रश्‍नावर नेहमीच आवाज उठविला असून राष्ट्रवादी पक्षाच्या फुटीनंतर त्यांनी शरद पवार यांची भेट घेउन समर्थन दिले होते. लोकसभा निवडणूकीत ते लंके यांच्या प्रचारासाठी सक्रीय होते.

# लंके समर्थकांवर कारवाई करा

## ▪ भाजपा पदाधिकार्‍यांची मागणी
## ▪ महिलेस मारहाण केल्याची तक्रार



▪ हर्षदा पानमंद यांना मारहाण झाल्याचा आरोप करीत भाजपा पदाधिकार्‍यांनी पत्रकार परिषदेत खा. नीलेश लंके समर्थक कार्यकर्त्यांवर कारवाई करण्याची मागणी केली.

सुपा : प्रतिनिधी

**खा. नीलेश लंके यांचे समर्थक राहुल झावरे व त्यांच्या सहकार्‍यांनी महिलेस केलेल्या मारहाणीची पोलीस प्रशासनाने गंभीर दखल घेऊन कारवाई करावी अशी मागणी भारतीय जनता पक्षाच्या वतीने सुप्यातील पंचशिल हॉटेलमध्ये घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत केली.**

निवडणूकीतील पराभव आम्ही स्विकारला, तुम्ही उद्रेक करून विजयाचा आनंद घेऊ नका असा टोलाही यावेळी पदाधिकार्‍यांनी लगावला. गुरूवारी गोरेगांव येथील प्रितेश पानमंद या भाजपा कार्यकर्त्याला शोधण्यासाठी राहुल झावरे आणि त्यांचे सहकारी ग्रामपंचायत कार्यालय परिसरात गेले. तिथून ते पानमंद यांच्या घरी गेले. पानमंद यांची पत्नी हर्षदा तसेच आईला त्यांनी जातीवाचक शिविगाळ करीत मारहाण केल्याचा आरोप भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे यांनी केला.

ज्यांना मारहाण झाली असा आरोप आहे त्या हर्षदा यांनी पत्रकार परिषदेत थेट राहुल झावरे यांचे नाव घेऊन त्यांच्या समवेत आलेल्यांनी मारहाण केल्याचे सांगितले. मी गर्भवती आहे, माझ्या पोटात लाथा मारल्या. कपडे फाडून तुझ्या नवर्‍याला आजच मारून टाकतो ,अशी धमकी दिल्याचे पानमंद यांनी सांगितले.

भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग म्हणाले, आम्ही पराभव स्विकारला आहे. परंतू तुम्ही तुमच्या विजयाचा आनंद साजरा करताना त्रास देण्याची भूमिका घेऊ नका. कार्यकर्त्यांना आवर घाला. कायम मारून टाकण्याच्या धमक्या दिल्या जातात, तुमच्याकडे गोळया तरी किती आहेत असा सवाल भालसिंग यांनी केला. यासंदर्भात पोलीस अधिक्षकांची भेट घेण्यात येऊन कारवाईची मागणी करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करतानाच भाजपाच्या प्रदेश कार्यालयानेही या घटनेची गंभीर दखल घेतल्याचे ते म्हणाले.

महायुतीच्या बाजूने मदत केल्याचा राग मनात धरून मागिल काही दिवसांपासून लंके समर्थकांकडून विखे समर्थक कार्यकर्त्यांना समाज माध्यमातून धमकावले जात आहे. दोन तीन दिवसांपासून असे प्रकार घडत आहेत. गुरूवारी घरांवर दगडफेक, गाडया फोडण्याच्या घटना घडल्याने महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

# झावरे हल्ला प्रकरणातील इतर आरोपी अटक करा

## जिल्हा बार असोसिएशनची मागणी



नगर : प्रतिनिधी

**अहमदनगर जिल्हा बार असोसिएशनचे सभासद अ‍ॅड. राहुल बबन झावरे यांच्यावर पारनेर येथे ६ जुन रोजी दुपारी १० ते १२ जणांच्या टोळक्याने प्राणघातक हल्ला केला असून या गुन्हयातील इतर आरोपी राजरोसपणे फिरत आहेत त्यांना तात्काळ अटक करण्याची मागणी जिल्हा बार असोसिएशनच्या वतीने पोलीस अधिक्षक राकेश ओला यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.**

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, दि.६ जुन रोजी अ‍ॅड. झावरे हे जिल्हा व सत्र न्यायालयात कामकाजासाठी येत असताना पारनेर बस स्थानकाच्या परीसरात त्यांच्यावर १० ते १५ जणांच्या टोळक्याने भ्याड हल्ला केला. त्यात अ‍ॅड.राहुल झावरे हे गंभीर रित्या जखमी झालेले असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. नगर येथील खाजगी रूग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या हल्ल्यातील काही आरोपींना पोलीस प्रशासनाने अटक केली असली तरी काही आरोपी अद्याप पावेतो राजरोसपणे फिरत आहेत. त्यांना त्वरीत अटक होऊन योग्य ती कायदेशीर कारवाई होणे आवश्यक असल्याचे या निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्यामधील वकिलांवर हल्ले दिवसेंदिवस वाढत आहेत. अशा हल्ल्यांमुळे वकिल वर्गात चिंतेचे वातावरण आहे. तसेच वकिलांना निर्भयपणे काम करण्यासाठी निर्भय वातावरण ठेवणे शासनाची जबाबदारी असल्याने सर्व आरोपींना अटक करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची विनंती या निवेदनात करण्यात आली आहे.

दरम्यान, नगर जिल्हयात अलिकडेच वकिल दाम्पत्याची हत्या करण्यात आली. त्यानंतर एका वकिलावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. त्यापाठोपाठ अ‍ॅड. राहुल झावरे यांच्यावर हल्ला झाल्याने वकिल वर्गात चिंता व्यक्त करण्यात येत आहे.


# शिवाजी खिलारी मारहाणप्रकरणी गुन्हा दाखल

## गुरूवारी मारहाण करीत फोडली होती गाडी

पारनेर : प्रतिनिधी

**मा. खा. डॉ. सुजय विखे यांचे खंदे समर्थक, टाकळी ढोकेश्‍वरचे माजी सरपंच शिवाजी खिलारी यांना गुरूवारी पारनेर पोलीस स्टेशन परीसरात झालेल्या मारहाण प्रकरणी नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या अज्ञात कार्यकर्त्यांविरोधात पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

लोकसभा निवडणूकीचा निकाल जाहिर झाल्यानंतर निर्वाचित खासदार नीलेश लंके यांचे खंदे समर्थक अ‍ॅड. राहुल झावरे, त्यांचे सहकारी तसेच भाजपा कार्यकर्त्यांमध्ये गोरेगांव येथे बाचाबाची झाल्यानंतर विजय औटी, नंदू औटी तसेच इतर १० ते १२ जणांनी अ‍ॅड. राहुल झावरे यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या झावरे यांना तातडीने नगर येथे उपचारासाठी दाखल करण्यात येईपर्यंत या घटनेची माहीती तालुकाभर वार्‍यासारखी



पसरली. त्यानंतर लंके समर्थकांचा उद्रेक पहावयास मिळाला.

झावरे यांच्या मारहाणीच्या घटनेनंतर शेकडोंच्या संख्येने लंके समर्थक पारनेरमध्ये दाखल झाले. त्यांनी आरोपी विजय औटी व नंदू औटी यांच्या संपर्क कार्यालयावर जोरदार दगडफेक केली. पोलीसांनी हा जमाव पांगविल्यानंतर जमावाने पोलीस ठाण्याच्या दिशेने कुच केली. पोलीस ठाण्यात विजय औटी व इतर आरोपी असल्याने या जमावाने पोलीस ठाण्याच्या परीसरात ठाण मांडून आरोपींवर कारवाई करण्याची मागणी केली. त्याच वेळी पोलीस ठाण्यातून एक आरोपी पळून जात असल्याची कुजबूज सुरू झाली आणि जमाव सैरभैर झाला. त्यातच भुमी अभिलेख कार्यालयात खाजगी कामासाठी आलेले शिवाजी खिलारी जमावाच्या हाती लागले. त्यात जमावाने त्यांना मारहाण केली. सुजय पर्व स्टिकर लावलेली त्यांची कार त्याचा परीसरात लावण्यात आली होती. या कारचीही जमावाने मोठया प्रमाणात तोडफोड केली. खिलारी यांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# कासारे येथे शिवस्वराज्यभिषेक दिन साजरा

## छत्रपतींच्या प्रतिमेला पुष्पहार ; पताका फडकविली

कासारे : प्रतिनिधी



**शिवराज्याभिषेक दिन ६ जूनला संपूर्ण राज्यात दरवर्षी मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.पारनेर तालुक्यातील कासारे येथेही ग्रामपंचायतमध्ये छत्रपतींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व पताका फडकवून हा सोहळा साजरा करण्यात आला.**

यावेळी सरपंच शिवाजीराव निमसे म्हणाले छत्रपती शिवरायांनी बहुजन समाजाच्या उद्धारासाठी मोठे कार्य केले आहे त्यांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचले पाहिजे. यासाठी आपण सर्वजण काम करत आहोत.कासारे येथे आम्ही शिवराज्याभिषेक दिन साजरा केला आहे.

यावेळी सरपंच शिवाजीराव निमसे,सरपंच, उपसरपंच शैलाताई घनवट, युवा नेते गोकुळ निमसे, रोहित निमसे, पोपटराव नरड सर, बाबाजी दातीर, बबन दातीर, गोरख दातीर, कैलास दातीर, किसन कासुटे, सोन्याबापू दातीर, शंकर द. दातीर, गोरख घनवट, शंकर मिसाळ, आदिनाथ निमसे, ग्रामसेविका पुष्पा डेरे, आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# मातोश्री सायन्स कॉलेजचा बारावीचा निकाल १००% टक्के

## संस्कार खामकर विद्यालयात प्रथम

कर्जुले हर्या : प्रतिनिधी

**येथील मातोश्री शैक्षणिक संकुल संचलित मातोश्री सायन्स कॉलेज मध्ये बारावी मधील विज्ञान शाखेचा निकाल १००% लागला आहे. फेब्रुवारी/मार्च २०२४ परीक्षेकरिता १२४ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.**

सदर विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक संस्कार सुनिल खामकर(७९.१७%), द्वितीय क्रमांक यशवंत प्रल्हाद भालेकर(७६.१७%), तृतीय क्रमांक दिव्या ज्ञानदेव सुंबरे(७४.५०%), चतुर्थ क्रमांक वैष्णवी भरत आंधळे(७४.३३%), पाचवा क्रमांक गायत्री कैलास देशमुख(७४.१७%), यांनी क्रमांक पटकावले. कॉलेजमध्ये प्रथम क्रमांक आलेला संस्कार सुनिल खामकर या



विद्यार्थ्याचा टाकळी ढोकेश्‍वर केंद्रामध्ये तृतीय क्रमांक आला आहे. गेली चार वर्ष १००% टक्के निकालाची परंपरा आजही कायम राहण्यासाठी सर्व शिक्षकांनी अथक परिश्रम घेतले.

कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शैक्षणिक वातावरणाबरोबरच क्रीडा, मनोरंजन क्षेत्रातील विविध उपक्रमांचा वर्षभरामध्ये सातत्याने आयोजन केले जाते. यशस्वी विद्यार्थ्यांचे परिसरातून मोठ्या प्रमाणात कौतुक करत अभिनंदनचा वर्षाव करण्यात आला.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्राचार्य राहुल सासवडे, गणेश हांडे, राजेंद्र साठे, अजिंक्य बिडकर, कविता भालेराव, सुवर्णा उंडे यांचे मोलाचे अनमोल मार्गदर्शन लाभले.सायन्स कॉलेजच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मिराताई आहेर, सचिव किरण आहेर, कार्याध्यक्ष डॉ. दिपक आहेर, खजिनदार बाळासाहेब उंडे, संचालिका डॉ. श्‍वेतांबरी आहेर, ग्लोबल स्कूलच्या मुख्याध्यापिका शितल आहेर, विजय आहेर सर, सर्व प्राचार्य, विभाग प्रमुख, सर्व शिक्षक, ग्रामस्थ, पालक यांनी या विद्यार्थ्यांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणार्‍या प्राध्यापकांचे अभिनंदन केले व विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचाली करता शुभेच्छा दिल्या.

# भाऊसाहेब जगदाळे पाटबंधारे विभागातून सेवानिवृत्त

## वासुंदे ग्रामस्थांनी भूमिपुत्राचा केला सन्मान

वासुंदे : प्रतिनिधी

**वासुंदे येथील भाऊसाहेब जगदाळे यांनी गेली ३३ वर्ष पाटबंधारे विभागामध्ये शासकीय कर्मचारी म्हणून यशस्वी सेवा केली ते नुकतेच सेवानिवृत्त झाले आहे. त्यांचा वासुंदे ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.**

भाऊसाहेब जगदाळे हे पाटबंधारे विभागामध्ये काम करत असताना त्यांनी आश्वी, वासुंदे, ढवळपुरी या विभागामध्ये काम केले आहे. पाटबंधारे विभागात एक जुने अनुभवी शासकीय कर्मचारी म्हणून त्यांची ओळख अलीकडे होती. अतिशय तल्लख बुद्धी, अनुभव संपन्न व्यक्तिमत्व म्हणून त्यांना ओळखले जाते.जगदाळे पाटबंधारे विभागातून त्यांची ३३ वर्षाची सेवा पूर्ण करून सेवानिवृत्त झाले त्यांच्या कारकीर्दीचा गौरव म्हणून अहमदनगर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजितराव झावरे पाटील व वासुंदे येथे



ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी सुजित झावरे पाटील यांनी भाऊसाहेब जगदाळे यांना शुभेच्छा दिल्या ते म्हणाले भाऊसाहेब जगदाळे हे पाटबंधारे विभागामध्ये शासकीय कर्मचारी म्हणून सेवा करत असताना एक अतिशय प्रामाणिक व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख राहिली आहे. पाटबंधारे विभागातील एक अनुभवी कर्मचारी सेवानिवृत्त होत आहे. यशस्वी सेवा पूर्ण करून ते सेवानिवृत्त होत असल्याने आपल्या सर्वांच्या वतीने त्यांना पुढील निरोगी जीवनाच्या खूप खूप शुभेच्छा.

यावेळी मा. सभापती अरुणराव ठाणगे, किसनराव धुमाळ, स्वप्निल राहींज, शरद पाटील सर, भाऊ सैद, उपसरपंच शंकर बर्वे, चेअरमन नारायण झावरे, व्हा. चेअरमन रा. बा. झावरे, दिलीपराव पाटोळे, बाळासाहेब पाटील, लक्ष्मण झावरे, मा. उपसरपंच लहानु झावरे, भाऊसाहेब जगदाळे, बाळासाहेब झावरे, पोपट झावरे सर, सुनील सैद, मारुती उगले गुरुजी, संग्राम झावरे, शांताराम झावरे, अशोक चेमटे सर, इंजि. निखिल दाते, इंजि. प्रसाद झावरे, विकास झावरे, आदी वासुंदे येथील ग्रामस्थ भाऊसाहेब जगदाळे यांचा मित्रपरिवार उपस्थित होता. जगदाळे सेवानिवृत्त झाले त्यामुळे त्यांना पाटबंधारे विभागाचे उपअभियंता विकास शिंदे व शाखा अभियंता अभिजीत मोरे यांनी सुद्धा सत्कार व सन्मान करून पुढील जीवन वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com